**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.गौतम उत्तम चव्हाण
शिक्षक कॉलनी, करमाळा रोड, टेंभुर्णी, ता.माढा, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

(१)**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी,
पुणे विभाग, पुणे — उत्तरवादी
(२)**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष समाजकल्याण अधिकारी
सोलापूर, जि.सोलापूर
**जन माहिती अधिकारी** तथा संस्था अध्यक्ष व मुख्याध्यापिका,
आश्रमशाळा टेंभुर्णी , ता.माढा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६२३+८०६ / सोलापूर / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७ .१०.२००८ (वि.अ.नि.का.) |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.गौतम उत्तम चव्हाण
शिक्षक कॉलनी, करमाळा रोड, टेंभुर्णी, ता.माढा, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष समाजकल्याण अधिकारी
सोलापूर, जि.सोलापूर प्रतिनिधी श्री.श्री.सि.कलशेट्टी

(१)**जन माहिती अधिकारी** तथा संस्था अध्यक्ष व मुख्याध्यापिका,
आश्रमशाळा टेंभुर्णी , ता.माढा, जि.सोलापूर प्रतिनिधी श्री.श्री.सि.कलशेट्टी
(२)**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका (माध्यमिक),
आश्रमशाळा टेंभुर्णी , ता.माढा, जि.सोलापूर श्रीमती जयश्री गवळी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.८.२००७ (अ.क्र.६२३)<br>दि. ११.३.२००८ (अ.क्र.८०६) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ७.१०.२००८ (अ.क्र.८०६) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.१२.२००७ (अ.क्र.८०६) |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १.१.२००८ (अ.क्र.८०६) |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>**अपील क्रमांक/६२३**<br>जून १९९९ ते जून २००७ या काळातील श्री संत रोहिदास प्राथमिक आश्रमशाळा येथील शिक्षकेतर कर्मचारी यांच्या नेमणुकीच्या तारखा व त्यांना समाजकल्याण खात्याने दिलेली मंजुरी व मान्यतेच्या दिनांकासह सत्यप्रती. शिक्षक कर्मचारी भरताना वर्तमानपत्रात दिलेली जाहिरात, सेवायोजन कार्यालयाकडून यादी मागवून घेतली होती काय, असल्यास प्रत. मुलाखत दिनांक व हजर उमेदवारांची यादी. तसेच हजेरीपत्रक व समाजकल्याण खात्याने मंजुरी दिलेल्या सर्व कर्मचाऱ्यांच्या मासिक पगार पत्रक यांच्या सत्यप्रती.<br>**अपील क्रमांक/८०६**<br>श्री शिव-शक्ती शिक्षण प्रसारक मंडळ, टेंभुर्णी या संस्थेचे संचालक यांच्या पत्रानुसार मुख्याध्यापक यांच्यावर केलेली कारवाई, उपोषणाच्या दिवसाचा निरीक्षक यांचा अहवाल, श्री.राहुल चव्हाण रुजू करण्यात आले त्याचा अहवाल,श्री.देशपांडे यांना दिलेल्या पत्राची प्रत, कर्मचारी शिक्षक /शिक्षकेतर यांच्या नेमणुकीच्या ठरावाच्या प्रती. संचालक मंडळाच्या मिटिंगला हजर असणाऱ्या संचालकांच्या सह्यांची प्रत. | |

## विवेचन

शिवशक्ती शिक्षण प्रसारक मंडळ, टेंभुर्णी संचलित आश्रमशाळेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संदर्भात सन १९९६ ते २००७ या कालावधीतील माहिती आपण मागितली होती. माहिती अपुरी मिळाली, तसेच सेवक नेमणुकीसाठी वृत्तपत्रात दिलेल्या जाहिरातीची प्रत व यादी दिली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.गौतम उत्तम चव्हाण यांनी केले.

श्री.चव्हाण यांनी मागितलेली माहिती प्राथमिक / माध्यमिक आश्रमशाळा, टेंभुर्णी व शिवशक्ती शिक्षण प्रसारक मंडळ, टेंभुर्णी यांच्याशी संबंधित असल्यामुळे, माहिती तात्काळ देण्याच्या सूचना त्यांना देण्यात आली. परंतु संस्थेने माहिती न देण्याच्या कारणावरुन श्री.चव्हाण यांनी विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सोलापूर व विभागीय समाजकल्याण अधिकारी,

पुणे विभाग, पुणे यांच्याकडे अपील केले. मात्र शाळेच्या मुख्याध्यापकांनी शुल्काबाबतचे पत्र देऊ केले असता श्री.चव्हाण यांनी ते स्वीकारले नव्हते, म्हणून मुख्याध्यापकांनी आपल्या कार्यालयाकडे माहिती सादर केली होती. शुल्क भरल्यानंतर श्री.चव्हाण यांना आपल्या कार्यालयाच्या वतीने माहिती देण्यात आली, असे लेखी व तोंडी प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री.श्री.सि.कलशेट्टी यांनी केले. संस्थेने दि.२६.५.१९९९ रोजी सेवक भरतीसाठी जाहिरात दिली होती व सेवायोजन यादी मागविली होती. त्यांनतर सन २००७ पर्यंत जाहिरात दिलेली नाही. संस्थेकडे आलेल्या अर्जांमधून नियुक्ती केलेली आहे, असे संस्थेचे अध्यक्ष श्री.कैलास भिकाजी सातपुते यांनी लेखी व तोंडी नमूद केले. संस्थेच्या अध्यक्षांनी सेवक भरतीबाबतचे लेखी निवेदन, सर्व ठराव, नेमणूक आदेश आदीच्या प्रतींसह सर्व माहिती दिली. त्यामुळे आपली काही तक्रार नाही, असे लेखी निवेदन श्री.चव्हाण यांनी आयोगाला सादर केले. मात्र आपल्याला दिलेल्या प्रतींवर संस्थेचा शिक्का नव्हता. शिक्का घेण्यासाठी आपण आश्रमशाळेवर गेलो असता, सर्व प्रतींवर शिक्के मारुन देतो, म्हणून संस्थेचे अध्यक्ष प्रती घेऊन गेले त्या आपल्याला परत देण्यात आलेल्या नाहीत, अशी तक्रार श्री.चव्हाण यांनी दि.२०.१०.२००८ व दि.१७.१२.२००८ रोजी केली. याबाबतच्या वस्तुस्थितीचा खुलासा जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका(माध्यमिक), आश्रमशाळा टेंभुर्णी, ता.माढा, जि.सोलापूर यांनी करणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२४.०९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री.मधुकर एन. नाईक,
२५/८, हरीकृपा नाथपैनगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई-७७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अतिरिक्त आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा** उपआयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६३२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१५.०९.२००९ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** अतिरिक्त आयुक्त,<br>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८ श्री.सुधाकर विष्णू देशमुख<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** उपआयुक्त,<br>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८ श्री.अशोक गणपतराव भोसले | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२६.१२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.-- |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०६.०२.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२०.०३.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -**<br><br>अपीलकर्ता श्री.नाईक यांचे घराला म.न.पा.मार्फत कोणताही पाणीपुरवठा केला जात नसताना देखील आकारण्यात आलेल्या रु.९५९/- च्या बिलाच्या अनुषंगाने सदरचे बील कोणत्या नियमाआधारे आकारण्यात आले, याबाबतचा खुलासा. | |

# विवेचन

दि.१.४.२००५ ते ३१.३.२००६ या कालावधीत आपल्या सदनिकेमध्ये पाणीपुरवठा झालेला नसताना बिल कसे आकारले, याबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.मधुकर एन.नाईक यांनी नगरसचिव विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे मागितली होती. तेथून तो अर्ज जन माहिती अधिकारी तथा भाग अधिकारी यांच्याकडे वर्ग करण्यात आला. श्री.नाईक यांनी मूळ अर्जामध्ये पाणीपुरवठा होत नसल्याबाबत तक्रार केली असून त्यांची सदनिका देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या कक्षेत येते. पाणीपुरवठ्याविषयीच्या तक्रारीबाबत त्यांनी देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाशी संपर्क साधणे आवश्यक आहे, असे त्यांना कळविण्यात आले, त्याव्यतिरिक्तची माहिती त्यांना देण्यात आली, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी लेखी निवेदनाद्वारे व दि.१२.६.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले. संपूर्ण माहिती त्यांना देण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. आपल्याला पाठविलेले बिल विकसकाच्या / सोसायटीच्या नावाने देणे अपेक्षित असताना व्यक्तिश: आपल्या नावे पाठविले गेले, त्यामुळे आपल्यावर कारवाई केली जाऊ शकते अशी तक्रार श्री.नाईक यांनी लेखी व तोंडी नमूद केली आहे. परंतु अशाप्रकारे त्यांच्याविरुध्द कोणतीही कारवाई केली जाणार नाही, तसे पत्र त्यांना देण्यात येईल असे तत्कालीन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी 'विशेष अपील कार्यक्रमा'तील प्रपत्रात नोंदविले होते. त्यानुसार दि.१३.६.२००८ रोजी रजिस्टर्ड टपालाने पाठविण्यात आले, असे विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.अशोक गणपतराव भोसले व अपिलीय प्राधिकारी श्री.सुधाकर विष्णू देशमुख यांनी संबंधित पत्राच्या प्रतीसह नमूद केले.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि १७.०९.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. हरिविजय बाबासाहेब घोडके
रा. सि. स. नं.१०३५, सी-वॉर्ड,
भोई गल्ली, कोल्हापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** पोलीस अधिक्षक,
पोलीस अधिक्षक कार्यालय, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी तथा** उप विभागीय पोलीस अधिकारी,
शहर विभाग, सोन्या मारुती चौक, कोल्हापूर

उत्तरवादी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६६२ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.९.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. हरिविजय बाबासाहेब घोडके
रा. सि. स. नं.१०३५, सी-वॉर्ड, भोई गल्ली, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी तथा** पोलीस अधिक्षक,
पोलीस अधिक्षक कार्यालय, कोल्हापूर प्रतिनिधी श्री.पी.जी.जमादार

**जन माहिती अधिकारी तथा** उप विभागीय पोलीस अधिकारी,
शहर विभाग, सोन्या मारुती चौक, कोल्हापूर प्रतिनिधी श्री.पी.जी.जमादार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२०.१.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.४.२.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१२.२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.८.३.२००९ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**

लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे सौ.ऐश्वर्या हरिविजय घोडके यांनी दिनांक ३.६.२००८ रोजी दिलेला जबाब कोणत्या क्रमांकाच्या दखलपात्र गुन्ह्यामध्ये अथवा कोणत्या क्रमांकाच्या अदखलपात्र गुन्ह्यामध्ये अथवा कोणत्या अर्जात समाविष्ट करण्यात आला आहे, त्याची माहिती व त्या जबाबाची नक्कल, तसेच सदरचा जबाब लक्ष्मीपुरी पोलीस ठाण्यातील कोणत्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या हस्ताक्षरात लिहिलेला आहे त्याची माहिती.

## विवेचन

आपली पत्नी सौ.ऐश्वर्या हरिविजय घोडके हिने दि.३.६.२००८ रोजी लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे, कोल्हापूरमध्ये दिलेल्या जबाबाची प्रत आपल्याला मागूनही मिळत नसल्याच्या कारणावरुन अपीलकर्ता श्री.हरिविजय बाबासाहेब घोडके यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

जन माहिती अधिकाऱ्यांनी ठाण्याच्या दैनंदिनीतील लागूपुरता उतारा श्री.घोडके यांना दिला. सौ.ऐश्वर्या घोडके तक्रार देण्यासाठी आल्या होत्या, परंतु प्रतिष्ठित नागरिक डॉ.बुलबुले यांच्यासमक्ष चर्चेअंती समझोता झाल्याने तक्रार दिली नाही, असे या उताऱ्यात नमूद केले आहे. श्री.घोडके यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलिस अधीक्षक, कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. परंतु विहित मुदतीत त्यांच्याकडून काही कळले नाही, असे त्यांनी नमूद केले. मात्र सौ.घोडके यांचा जबाब पोलीस निरीक्षक, लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे यांनी घेतलेला नाही, असे नमूद करुन अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, कोल्हापूर यांनी अपील निकाली काढले. मात्र प्रत्यक्षात असा जबाब झाला आहे. त्यावर सौ.घोडके, तिची आई, तिचे वडील, तिचा भाऊ व तिचा आतेभाऊ आणि आमचे भागातील प्रतिष्ठित नागरिक श्री.अरुण टोपकर व मी तसेच इतर दोघांच्या सह्या आहेत, असे डॉ.प्रमोद अनंतराव बुलबुले यांनी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पाटण यांच्या न्यायालयात दाखल केलेल्या दि.९.१.२००९ च्या प्रतिज्ञापत्रात स्पष्टपणे म्हटले आहे, असे अपीलकर्त्याने संबंधित प्रतिज्ञापत्राच्या प्रतीसह नमूद केले.

वरील बाबी लक्षात घेता जबाब झाला आहे, या अपीलकर्त्याच्या म्हणण्यास पुष्टी मिळते. याबाबत चौकशी करुन तत्कालीन संबंधित अधिकाऱ्यांसह सर्व संबंधितांकडून माहिती घेऊन वस्तुस्थितीची शहानिशा होणे आवश्यक आहे. म्हणून आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

**आदेश**

(१) अपील अंशतः मान्य.

(२) सौ.ऐश्वर्या हरिविजय घोडके यांच्या जबाबाबाबतच्या वस्तुस्थितीची तत्कालीन पोलीस कर्मचाऱ्यांसह जबाबाच्या वेळी उपस्थित असणाऱ्यांकडून शहानिशा करुन अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती शारदा राऊत यांनी दि.३०.९.२००९ पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १७ .९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. बाळासाहेब हरिभाऊ धेंडे
स.नं. ३६/१, विद्यानगर, पुणे-१५ अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य उद्यान अधीक्षक विभाग,
संभाजी पार्क, पुणे महागनरपालिका, पुणे-५

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अधीक्षक,
पुणे महागनरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६७१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १२.८.२००९ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. बाळासाहेब हरिभाऊ धेंडे
स.नं. ३६/१, विद्यानगर, पुणे-१५

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य उद्यान अधीक्षक विभाग,
संभाजी पार्क, पुणे महागनरपालिका, पुणे-५ श्री. भानुदास ग. माने

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अधीक्षक,
पुणे महागनरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७.२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७.३.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६.४.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सोबत छायांकित प्रत जोडली आहे.

## विवेचन

पुणे महानगरपालिकेच्या जागेत घेतलेल्या विकास कामाचे अंदाजपत्रक व आराखडा जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवरुन मिळाला नाही. संबंधित जागेवरील बांधकामाच्या आराखडयानुसार कामाला अडथळा होत असलेल्या अनधिकृत धार्मिक मंदिर व समाजमंदिर ही बांधकामे पाडण्याच्या ठरावाबाबतची माहिती देण्यात आलेली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. बाळासाहेब हरीभाऊ धेंडे यांनी केले.

श्री. धेंडे यांना माहिती देण्यात आली. त्यांनी उल्लेख केलेल्या अनधिकृत बांधकामाची माहिती महानगरपालिकेकडे नाही. तसेच याबाबत कोणताही ठराव झालेला नसून शासकीय जागेवरील कोणतेही अनधिकृत बांधकाम पाडण्याचा महानगरपालिकेला अधिकार आहे, असे उत्तर जन महिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत दिले आहे. अंदाजपत्रक व आराखडा याच्या प्रती देण्यात आलेल्या नाहीत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी यांनी केले.

अंदाजपत्रक व आराखडा याची प्रत अपीलकर्त्यास त्वरित देण्यात यावी, तसेच अनधिकृत बांधकामासंदर्भातील माहिती आठ दिवसांत द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार पूर्तता केल्याचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य उद्यान अधीक्षक, उद्यान विभाग, पुणे महानगरपालिका यांनी आयोगाला सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**( विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २५.०९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.कृष्णाजी शिवराम बनसोडे
मु.पो.वेळापूर, ता.माळशिरस, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती माळशिरस, जि.सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, बांधकाम उपविभाग,
पंचायत समिती माळशिरस, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७३३ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.८.१०.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.कृष्णाजी शिवराम बनसोडे
मु.पो.वेळापूर, ता.माळशिरस, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती माळशिरस, जि.सोलापूर श्री.जी.बी.भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, बांधकाम उपविभाग,
पंचायत समिती माळशिरस, जि.सोलापूर श्री.एम.व्ही.खद्दे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.६.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.१०.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>भांबुर्डा येथील चारी व रोडचे कामाबाबत. सदरच्या कामाचे वर्गीकरण काय व तयाचे प्लॅन आणि एस्टीमेटची नक्कल. वेळापूर ता.माळशिरस येथे मागासवर्गीय वस्तीत डांबरी रस्ते, गटारे, केलेली आहेत ती कोणत्या योजनेखाली व त्याचे प्लॅन आणि एस्टीमेट, ग्रामपंचायत ठरावाच्या नकलांसह. | |

## विवेचन

दि.८.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांत एकमत झाले नाही, त्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

गावातील रस्त्याच्या संदर्भातील माहिती उपअभियंता, बांधकाम यांनी दिली नाही, त्यामुळे दुसरा अर्ज केला, तोही त्यांनी नाकारला. त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, बांधकाम विभाग श्री.एम.व्ही.खद्दे यांना दंड व्हावा, अशी मागणी अपीलकर्ता श्री.कृष्णाजी शिवराम बनसोडे यांनी केली. श्री.बनसोडे यांच्या मागणीनुसार माहिती तयार असल्याचे व शुल्क भरण्याबाबत विहित मुदतीत श्री.बनसोडे यांना कळविले होते. प्रत्यक्ष कागदपत्र बघितल्याशिवाय आपण शुल्क भरणार नाही, असे श्री.बनसोडे यांनी कळविले. कागदपत्रे पाहण्यासाठी कळविलेल्या वेळेनुसार ते आले नाहीत व शुल्कही भरले नाही, त्यामुळे माहिती दिली नाही. दुसरा अर्ज दाखल केला, असे ते म्हणतात, तो कार्यालयाला प्राप्त झालेला नाही. शुल्क भरल्यास आजही माहिती तयार आहे, असे जन माहिती अधिकारी श्री.एम.व्ही.खद्दे यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माळशिरस श्री.जी.बी.भोसले

यांनी जन माहिती अधिकाऱ्यांच्या प्रतिपादनास दुजोरा दिला. अपीलकर्ता शुल्क भरुन माहिती घेत नाहीत, शासकीय अधिकाऱ्यावर कारवाई व्हावी असाच त्यांचा सातत्याने आग्रह आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माळशिरस श्री.जी.बी.भोसले यांनी प्रतिपादन केले.

अपीलकर्त्याने माहिती आवश्यक असल्यास शुल्क भरुन प्राप्त करुन घ्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२९.०९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.मधुकर केरबा उबाळे
मु.पो.सारोळे, ता.बार्शी, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
बार्शी, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सारोळे विकास कार्यकारी सेवा
सहकारी संस्था मर्यादित सरोळे, ता.बार्शी, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७४६ / सोलापूर /२००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७ .१० .२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मधुकर केरबा उबाळे
मु.पो.सारोळे, ता.बार्शी, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
बार्शी, जि.सोलापूर श्री.एम.एल.माळी

**जन माहिती अधिकारी** तथा सारोळे विकास कार्यकारी सेवा
सहकारी संस्था मर्यादित सरोळे, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.शि. भा.जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११.१.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.१.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>दि.३०११.१९८८ ते २००७ पर्यंतच्या कर्जाच्या तपशिलाप्रमाो कर्जासाठी घेतलेलया सह्यांची कागदपत्रे, कर्ज देण्यासाठी व वसुल करतेवेळी वापरलेली कागदपत्रे, सहीशिक्क्यानिशी नक्कल | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२७.११.२००७ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.मधुकर केरबा उबाळे यांनी दि.३०.११.१९८८ ते २००७ पर्यंतची कर्जप्रकरणाची माहिती मागितली होती. नक्कलशुल्क भरल्यानंतर त्यांना उपलब्ध माहिती देण्यात आली. परंतु किमान सन १९९४ पासूनची माहिती आपल्याला मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता यांनी केली. कर्ज पूर्ण फिटल्यानंतर कागदपत्रे नाश केली जातात. श्री.उबाळे यांनी मागितलेल्या माहितीच्या अभिलेखांचा जतनाचा कालावधी दहा वर्षांचा आहे. सन १९८८ ते १९९७ या कालावधीची माहिती दहा वर्षांपूर्वीची असल्यामुळे देता येत नसल्याचे त्यांना कळविलेले आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री.शि.भा.जाधव व अपिलीय प्राधिकारी श्री.एम.एल.माळी यांनी केले. कागदपत्रांच्या जतनाच्या कालावधीबाबत अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, बार्शी, जि.सोलापूर यांनी अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले होते, त्यानुसार

संस्थेने केलेली कार्यवाही कागदपत्रांच्या जतनाच्या दहा वर्षांच्या कालावधीनुसार योग्य आहे. असा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, बार्शी, जि.सोलापूर यानी दि.२३.९.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२४.०९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे १

श्रीमती विद्या दिलीप लोंढे
विद्यानगर गल्ली क्र. ४ वारणाली रोड, विश्रामबाग , सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष,
ग्रामिण समाज प्रबोधिनी, येळवण, ता.राजापूर जि. रत्नागिरी — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका,
विद्यानिकेतन, येळवण, ता.राजापूर, जिल्हा रत्नागिरी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७६/ सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | १५-०९-०९ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका,
विद्यानिकेतन, येळवण, ता.राजापूर, जिल्हा रत्नागिरी श्रीमती विजयालक्ष्मी वि.लब्दे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | ०४-०७-२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | ११-०९-२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | १०-१०-०९ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :**

शिक्षणसेवकपदी नियुक्ती केल्याबाबतच्या दि. १/२/२००२ च्या पत्राची प्रत, शाळेत हजर होण्याबाबतच्या दि. २१/११/२००५ च्या पत्राची प्रत, व शाळेच्या सेवेतून २९/१२/०५ च्या नोटिशीची प्रत.

## विवेचन

अपीलकर्त्या श्रीमती विद्या दिलीप लोंढे यांनी स्वत:च्या सेवाविषयक कागदपत्रांच्या प्रती मागितल्या होत्या. त्याबाबतचे उत्तर जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, विद्यानिकेतन येळवण, जि.रत्नागिरी यांनी पाठविले. आपल्याला मिळालेली माहिती त्रोटक व असमाधानकारक आहे. अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तरातही तफावत आहे, म्हणून श्रीमती लोंढे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाने दि.१४.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'स जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी गैरहजर होते त्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

श्रीमती लोंढे यांना मूळ अर्जानुसार उत्तर देण्यात आले आहे, असे जन माहिती अधिकारी श्रीमती विजयालक्ष्मी लब्दे यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. श्रीमती लोंढे न्यायालयाच्या निर्णयानुसार सध्या आपल्याच विद्यालयात सेवेत असून शाळा न्यायाधिकरणापुढे त्यांचे अपील प्रलंबित आहे. नसलेल्या कागदपत्रांची मागणी त्या करीत आहेत, असे प्रतिपादन श्रीमती लब्दे यांनी केले. माहितीत असलेल्या तफावतीविषयीची कोणतीही कागदपत्रे श्रीमती लोंढे यांनी सादर केलेली नाहीत.

वरील बाबी लक्षात घेता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१५.९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम , २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार करुन खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत:-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ७६७/ पुणे | श्री.नाना गेनू धुमाळ स.नं.४५/४-बी, खराडी रोड, पुणे-४४ | सह दुय्यम निबंधक हवेली क्र.२, पुणे | सह जिल्हा निबंधक (वर्ग-१) व मुद्रांक जिल्हाधिकारी, ५, फायनान्स रोड, शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय इमारत, पहिला मजला, पुणे-१ | सह दुय्यम निबंधक हवेली क्र.२, खरेदी दस्त क्र.४५४७/८३ दि.०५.०७.१९८३ मिळणेबाबत | आवश्यक कागदपत्रे मिळण्याकरिता शासनाच्या प्रचलित नियमावलीनुसार विहित पध्दतीने अर्ज करावा. अशा बाबतीत माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत अर्ज करणे योग्य नाही. |
| २ | ५०९/ २००९/ पुणे | श्री.मधुकर हिराजी मुळे मुळे गल्ली, पूर्णा, ता.पूर्णा, जि.परभणी | उपनिबंधक सहकारी संस्था, (नागरी बँका २), महाराष्ट्र राज्य, पुणे-१ | अपर निबंधक, सहकारी संस्था (तपासणी व निवडणुका), महाराष्ट्र राज्य, पुणे-१ | १) ठेवी परत करण्यावर निर्बंध लावण्यात आलेल्या पतसंस्थांची नावे, पत्ते तसेच राज्य फेडरेशनच्या पत्राची प्रत<br>२) अशा प्रकारचा पतसंस्थावरील निर्बंध लावला गेल्यास कधी उठविणार, या बाबतच्या शासन परिपत्रक व शासन निर्णयाची प्रत | १) जन माहिती अधिकारी यांनी कळविल्याप्रमाणे शुल्क भरल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देणेबाबत अपीलकर्त्यास कळविले आहे. अपीलकर्त्याने त्याप्रमाणे आवश्यक शुल्क भरुन माहिती घ्यावी.<br>२) माहिती |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ३) अशा प्रकारे निर्बंध लावल्यास ठेवीवर व्याज देणे बंधनकारक आहे का? ठेवी परतीची जबाबदारी कोणाची?<br>४) बुलढाणा अर्बन को.ऑप क्रेडिट सोसायटीच्या महाराष्ट्रात किती शाखा उघडल्या त्या गावांची तालुका, जिल्हानिहाय नावे व परवानगीची प्रत | अर्जातील मुद्दा क्र.२ व ३ मधील मागणी ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत 'माहिती' ठरत नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील तक्त्यातील एकूण २ अपिले अनुक्रमांक १ ते २ (अपील क्र. ७६७/पुणे, ५०९/२००९/पुणे ) निकाली काढण्यात येत आहेत.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १८ -०९-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

१. श्री. सुधीर रामचंद्र आल्हाट
२. श्री. राजू रामचंद्र पवार
३. श्री. लतिफ अकबर शेख
रा. १०३, नरवीर तानाजीवाडी, शिवाजीनगर, पुणे-५ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त (जनरल),
पुणे महानगरपालिका, पुणे — उत्तरवादी
**जन माहिती अधिकारी** तथा उपायुक्त,
(भूसंपादन व भूमी / जिंदगी ),
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७७८/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.८.२००८ |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** - १. श्री. सुधीर रामचंद्र आल्हाट<br>२. श्री. राजू रामचंद्र पवार<br>३. श्री. लतिफ अकबर शेख<br>रा. १०३, नरवीर तानाजीवाडी, शिवाजीनगर, पुणे-५<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त (जनरल),<br>पुणे महानगरपालिका, पुणे श्री. सूरज मांढरे<br>**जन माहिती अधिकारी** तथा उपायुक्त,<br>(भूसंपादन व भूमी / जिंदगी ), पुणे महानगरपालिका, पुणे<br>श्री. भानुदास माने | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३.३.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३.४.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.५.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>सोबत छायांकित प्रत जोडली आहे. | |

## विवेचन

रस्ता रुंदीकरणात सन १९९२ मध्ये दुकाने व घरे गेलेल्या नागरिकांना मंजूर केलेल्या सदनिकांबाबतची माहिती अपीलकर्ता श्री. सुधीर रामचंद्र आल्हाट यांनी मागितली होती. अन्य कार्यालयाकडून ही माहिती घेऊन देण्यामुळे विलंब झाला. मागितलेली माहिती व्यापक स्वरुपाची असून ती संकलीत करण्यास वेळ लागला, हे जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त, पुणे महानगरपालिका यांचे प्रतिपादन मान्य करुन, माहिती त्वरित देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिला. तरीही आपल्याला खोटी माहिती मिळाली, या कारणावरुन श्री. आल्हाट यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

ज्यांच्या जागा रस्ता रुंदीकरणात गेलेल्या नाहीत, अशा काही व्यक्तींना सदनिका मंजूर करण्यात आल्या आहेत. त्याबाबतची कागदपत्रे दिली जात नाही, अशी तक्रार श्री. आल्हाट यांनी केली. सदनिका/दुकाने मंजूर केलेल्या विस्थापितांच्या यादीत पाच नावे पात्र नसलेली आहेत. सर्व्हेक्षणामध्ये ही नावे समाविष्ट करणा-यावंर कारवाई केलेली आहे. अपात्र व्यक्तींची नावे रद्द करण्यात आली असून त्यांना सदनिका देण्यात आलेल्या नाहीत. दि.९.५.२००७ रोजी या व्यक्तींनी कार्यालयात येऊन गोंधळ घालून कागदपत्रे नष्ट केली. त्याबाबत तक्रार आल्यानुसार पुढील कारवाई करण्यात येत आहे, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी सांगितले. काही व्यक्तींनी गोंधळ घातल्याच्या तक्रारीची प्रत अपीलकर्त्यास द्यावी, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. त्यानुसार दि.२९.८.२००८ रोजी प्रत देण्यात आल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त, पुणे महानगरपालिका,पुणे यांनी आयोगास अवगत केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

### आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि. २१.९.२००९**

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम , २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत:-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ७८६/ २००९/ पुणे | श्री.किशोर टी.भिडे सर्व्हे नं.४७, प्लॉट नं.९०२, वॉर्ड नं.३, सुनितानगर, वडगाव शेरी, पुणे | कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग, सांगली | सहाय्यक अधीक्षक अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे मंडळ, पुणे | दि.०१.०४.२००६ ते दि.३१.०३.२००७ या कालावधीतील विभागीय कार्यालयासंबंधात एकूण १२ मुद्दयांची माहिती | दि.०१.०४.२००६ ते ३१.०३.२००९ या कालावधीतील विभागीय कार्यालयात सांगली लघु पाटबंधारे मार्फत नोटिसा प्रकाशित करण्यात आलेल्या वृत्तपत्राच्या पूर्ण पानांची छायाप्रत, नोटिसा प्रसिध्दीपूर्वी कार्यालयाशी त्या संदर्भात केलेल्या सर्व पत्रव्यवहाराच्या छायाप्रती, वेबसाईटची छायाप्रत, विभागाकडे असणाऱ्या सर्व बजेटहेड, त्यातून झालेला खर्च, सर्व योजना व त्यावरील |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | खर्च, निविदा - प्रसिध्दीच्या संदर्भातील सर्व कागदपत्र, चलनाच्या छायाप्रती, सर्व शाखा व उप अभियंता यांच्या मालमत्ता विवरणपत्राच्या छायाप्रती इ. १२ मुद्दयांबाबतची अत्यंत विस्तृत स्वरुपातील माहिती असल्याने माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी अपीलकर्त्यास दि.२२.०६.२००९ रोजीच्या पत्रान्वये अतिरिक्त शुल्क रु.५७०५/- भरल्यास माहिती टपालाद्वारे पाठविण्यात येईल असे कळविले. |
| २ | ७८७/ २००९/ पुणे | श्री. हनुमंत सदाशिव शिंदे मु.पो.सरडेवाडी, ता.इंदापूर, जि.पुणे | वन परिक्षेत्र अधिकारी इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे | - | अपीलकर्त्याच्या बांधावरील फळांची व इतर झाडे तोडल्या-बद्दल दि.१६.२.२००९ रोजी तक्रार अर्ज केला होता. या अर्जाबाबतच्या कार्यवाहीची माहिती | अपीलकर्त्याने प्रथम अपील न करता आयोगाकडे अपील केले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार प्रथम अपील करावे. |
| ३ | ७८९/ २००९/ पुणे | श्री.सिध्दार्थशंकर अमरनाथ शर्मा सी-३०९, | माहिती अधिकारी आय.एल.एस. | अपिलीय प्राधिकारी, आय.एल.एस. | सन २००८ ते २००९ या कालावधीतील विधी विद्यालयात विधी | अपीलकर्त्याने एकूण ५ अर्जांच्या अनुषंगाने एकच |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अनुराग को.ऑ.हौ.सो. महात्मा सोसायटीजवळ, कोथरुड, पुणे-३८ | विधी महाविद्यालय, लॉ कॉलेज रस्ता, पुणे-४ | विधी महाविद्यालय, लॉ कॉलेज रस्ता, पुणे-४ | विद्यालयात विद्यार्थ्यांकडून घेण्यात येणाऱ्या प्रवेश शुल्काच्या अनुषंगाने ३ मुद्दयांची माहिती, सन २००६ ते २००९ या कालावधीत झालेल्या विद्यालयातर्फे भाग घेणाऱ्या व प्रतिनिधित्व करण्याऱ्या स्पर्धासाठी विद्यार्थ्यांना अदा केलेल्या भत्त्यासंबंधात एकूण ४ मुद्दयांची माहिती | अपील केले आहे. प्रत्येक माहिती - मागणी अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्र अपील करणे आवश्यक आहे. |
| ४ | ७९०/ २००९/ पुणे | श्री.सिध्दार्थशंकर अमरनाथ शर्मा सी-३०१, अनुराग को.ऑ.हौ.सो. महात्मा सोसायटीजवळ, कोथरुड, पुणे-३८ | माहिती अधिकारी आय.एल.एस. विधी महाविद्यालय, लॉ कॉलेज रस्ता, पुणे-४ | अपिलीय प्राधिकारी, आय.एल.एस. विधी महाविद्यालय, लॉ कॉलेज रस्ता, पुणे-४ | सन २००६ ते २००९ या कालावधीत स्विमिंग पूल व जिम्नेशियमसाठी किती पैसे गोळा झाले, एकूण खर्च किती झाला, सदर कालावधीतील कल्चरल ॲक्टीव्हिटीज साठी किती पैसे जमा व खर्च झाले इ. माहिती | अपीलकर्त्याने एकूण ६ अर्जांच्या अनुषंगाने एकच अपील केले आहे. प्रत्येक माहिती-मागणी अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्र अपील करणे आवश्यक आहे. |
| ५ | ८०२/ २००९/ पुणे | श्री.बापू पांडुरंग पोळ मु.गोखळी, पो.बिजवंडी, ता.इंदापूर, जि.पुणे | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था बारामती, ता.बारामती, जि.पुणे | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे | बारामती तालुक्यातील मंजूर सहकारी संस्था, त्यांचे कार्यक्षेत्र, संस्थेचे सभासद, सभासदांच्या ओळखपत्राची छायांकित प्रती | माहिती मागणीच्या दि.०४.०४.२००९ च्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ ची माहिती आपल्या कार्यालयात उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकारी यांना उत्तरात म्हटले आहे. त्यांनी अर्ज संबंधितांकडे पाठवावयास हवा |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | होता, ते केलेले नाही. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी नियमानुसार देय ठरणारी माहिती प्राप्त करुन घेऊन १० दिवसात अपीलकर्त्यास द्यावी. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. वरील तक्त्यातील एकूण ०५ अपिले अनुक्रमांक १ ते ५ (अपील क्र. ७८६/२००९/पुणे, ७८७/२००९/पुणे, ७८९/२००९/पुणे, ७९०/२००९/पुणे व ८०२/२००९/पुणे ) निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्र.८०२/२००९/पुणे मध्ये निष्कर्षात नमूद / आदेशित केल्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल विहित मुदतपूर्तीनंतर ८ दिवसांत आयोगास सादर करावा. अन्यथा संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये शास्ती व तदनुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १४ -०९-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. नामदेव शामराव नालंदे
व्हील कॉलनी, बारामती, ता.बारामती, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा — उत्तरवादी
विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध), पुणे विभाग, पुणे

**जन माहिती अधिकारी**
व्यवस्थापकीय संचालक, बारामती तालुका सहकारी दूध उत्पादक संघ मर्या.,बारामती

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७९२ + ७९३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २४.६.२००८ |

३ **उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध), पुणे विभाग, पुणे
श्री. आर. के. लाखे

**जन माहिती अधिकारी** तथा व्यवस्थापकीय संचालक,
बारामती तालुका सहकारी दूध उत्पादक संघ मर्या.,बारामती
श्री. अ.रा.सुमंत

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सन २००० ते दि.२६.१२.२००६ या कालावधीत दूध संघात दरमहा किती लिटर दूध संकलित झाले व त्याची विक्री, प्रक्रिया व नासलेल्या दुधाची विल्हेवाट याबाबतची सविस्तर वार्षिक माहिती तक्त्यामध्ये मिळावी

## विवेचन

सन २००० ते दि. २६.१२.२००६ या कालावधीतील दूध संकलन, प्रक्रिया आदी बाबतची तसेच बारामती तालुका सहकारी दूध उत्पादक संघ, बारामती, जि. पुणे यांच्याकडील विविध विषयावरील दि. १.४.१९९६ ते ३१.१२.२००६ या कालावधीतील माहिती अपीलकर्ता श्री. नामदेव शामराव नालंदे यांनी अन्य अर्जांद्वारे विशिष्ट तक्त्यांमध्ये मागितली होती.

आयोगाने दि. २४.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने सुनावणी घेण्यात आली.

तीन कर्मचाऱ्यांच्या दहा दिवसांचा खर्च व संगणकावरील प्रतींचा खर्च यासह रू.१५,४३८/- शुल्क भरण्याबाबत उपमहाव्यवस्थापक, बारामती तालुका सहकारी दूध उत्पादक संघ मर्या., यांनी श्री. नालंदे यांना कळविले. 'लेबर चार्जेस' शुल्कात लावण्याला श्री. नालंदे यांनी आक्षेप घेतला. त्यानंतर दूध संघाने माहिती पाठविली व 'अधिक विस्तृत माहिती हवी असल्यास दूध संघाच्या कार्यालयात सर्व रेकॉर्ड सादर केले जाईल व आपल्याला हवी ती माहिती दिली जाईल,' असे जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक, बारामती तालुका सहकारी दूध उत्पादक संघ मर्या., यांनी कळविले. अपुरी माहिती मिळाल्याच्या कारणावरून श्री. नालंदे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध), पुणे विभाग यांच्याकडे अपील केले. झेरॉक्स अथवा संगणक प्रतींचा खर्च या व्यतिरिक्तचा खर्च आकारू नये, असा आदेश तत्कालीन अपिलीय प्राधिकारी डॉ. के.एन. जाधव यांनी दिले. 'आवश्यक ती माहिती देण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकाऱ्यांनी केल्याचे दिसून येते. माहिती टाळण्याचा त्यांचा हेतू प्रथमदर्शनी दिसून येत नाही व अधिकची माहिती देण्यास ते तयार आहेत. माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे अपीलकर्त्याने म्हटले असले तरी त्याचा पुरावा त्यांनी दिलेला नाही,' असे डॉ. जाधव यांनी निकाल पत्रात नमूद केले आहे.

माहिती अपूर्ण असल्याची शंका असल्यास श्री. नालंदे यांनी नेमक्या बाबी लेखी कळविल्यास फेर माहिती देण्याची व अपिले दाखविण्याची संस्थेची तयारी आहे. वेगवेगळ्या अर्जांद्वारे त्यांनी मागितलेली माहिती वेळोवेळी त्यांना शुल्क न भरताही देण्यात आली आहे, तसेच विस्तृत माहितीची मागणी असल्यामुळे

त्यांनी अभिलेखाचे अवलोकन करावे व आवश्यक कागदपत्राबाबत लेखी मागणी करून शुल्क भरून माहिती घ्यावी, असे जन माहिती अधिकारी यांनी दि. २४.६.२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात व स्वतंत्र निवेदनाद्वारेही नमूद केले आहे. माहिती पुरविण्यास संस्था तयार आहे. कर्मचाऱ्यांचा खर्च शुल्कामध्ये आकारता येणार नाही, असा आदेश आपण दिला असून त्यानुसार कार्यवाही करण्यास संस्था तयार आहे, असे तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध), पुणे विभाग, पुणे यांनी प्रपत्रात व लेखी निवेदनाद्वारे नमूद केले आहे. उभय बाजुंची निवेदने पाहता ते योग्य आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

२. अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध), पुणे विभाग यांनी दिलेला निर्णय योग्य असून तो कायम करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ०९.९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. विश्वास हेरंब धडफळे
७८, पाषण, पुणे-८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता (पथ), उत्तरवादी
पुणे महानगरपालिका, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उप अभियंता, पथ विभाग,
पुणे महानगरपालिका

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८०४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १३.८.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. विश्वास हेरंब धडफळे
७८, पाषण, पुणे-८

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता (पथ)
पुणे महानगरपालिका, पुणे श्री. एन.एन.बारापात्रे

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उप अभियंता, पथ विभाग,
पुणे महानगरपालिका श्री. एस.व्ही. संकपाळ

**<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**

मौजे पाषण, ता. हवेली, जि. पुणे येथील जमीन स.नं.१४०/५//७/८ येथे चालू असणाऱ्या रस्त्याच्या कामकाजाबाबतची माहिती

## विवेचन

मौजे पाषाण, ता. हवेली, जि. पुणे येथे चालू असणाऱ्या रस्त्याच्या कामाबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा नगर उप अभियंता, पथ विभाग, पुणे महानगरपालिका यांच्याकडून मिळाली नाही, म्हणून आपण अपिलीय प्राधिकारी तथा विकास अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याकडे अपील केले. त्यांच्या आदेशानुसार नगर उप अभियंता, पथ विभाग, पुणे महानगरपालिका, व क्षत्रिय अधिकारी, औंध क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका या दोघांनी दिलेल्या माहितीमध्ये तफावत आहे. त्यामुळे आपली दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला जात आहे, अशा कारणावरून अपीलकर्ता श्री. विश्वास हेरंब धडफळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आपल्याला कोणतीही माहिती मिळाली नाही व आपल्या जागेचे कुंपण रस्त्याचे काम करताना तोडण्यात आल्यामुळे जागेची भरपाई मिळणार की नाही, अशी विचारणा आपण केली होती, परंतु त्याचे उत्तर दिले जात नाही, अशी तक्रार श्री. धडफळे यांनी केली.

श्री. धडफळे यांच्या जमिनीमधून रस्ता करण्याबाबत कोणतीही नोटीस दिलेली नाही, असलेला रस्ता रूंद करण्यात येत असल्याचे त्यांना कळविले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा नगर उप अभियंता, पथ विभाग, पुणे महानगरपालिका श्री. एस.व्ही. संकपाळ यांनी नमूद केले. रस्त्याचे काम औंध क्षेत्रिय कार्यालयामार्फत चालू करण्यात आले होते. पुणे महानगरपालिकेने मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९, कलम २०५ अन्वये डी. पी. रस्त्याची आखणी केली होती. श्री. धडफळे यांनी हरकत घेतल्यामुळे ते काम तातडीने थांबविण्यात आले. रस्ता होत असलेल्या मिळकतीची मालकी श्री. धडफळे यांची आहे की नाही, हे स्पष्ट झालेले नाही. तसेच रस्त्यामुळे त्यांची मिळकत बाधित होत असेल तर त्यांनी उप आयुक्त, भूमि प्रापन, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याकडून त्याबाबतची खात्री करून घेतली पाहिजे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकाऱ्यांनी केले. संबंधित नकाशाची प्रत आपल्याला मिळावी, अशी मागणी श्री. धडफळे यांनी केली, त्यानुसार सुनावणीच्या वेळीच त्यांना नकाशाची प्रत जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली. दोन विभागांनी दिलेल्या माहितीत तफावत नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

श्री. धडफळे यांची मूळ मागणी जमिनीच्या मालकीच्या अनुषंगाने असून त्याबाबतचा निर्णय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. मात्र मूळ अर्जानुसार योग्य ती माहिती त्यांना तात्काळ जन

माहिती अधिकारी तथा नगर उप अभियंता, पथ विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी देणे आवश्यक होते, त्याबाबत त्यांना समज देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १० .९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. एम. डी.चौधरी
एफ-१४, वर्ल्ड ऑफ मदर,
जय गणेश व्हिजन, आकुर्डी, पुणे-३५ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सहकार आयुक्तालय,
मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१ — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, वडगाव मावळ, ता.मावळ, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८५१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १७.१२.२००८ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. एम. डी.चौधरी
एफ-१४, वर्ल्ड ऑफ मदर,
जय गणेश व्हिजन, आकुर्डी, पुणे-३५

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
सहकार आयुक्तालय, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१ श्री. सुनिल देशमुख

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, वडगाव मावळ, ता.मावळ, जि. पुणे श्री. आनंद अ. कटके

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.१०.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.११.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.४.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६.४.२००७ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

ईगल एम्प्लॉईज सोसायटीकडे शेअर्सची किती रक्कम जमा आहे, ती रक्कम सध्या कोणाकडे आहे, तिचे वितरणाचे हक्क कोणाला आहेत, जर पैसे जमा असतील तर ते का दिले जात नाहीत याबाबत माहिती

## विवेचन

ईगल एम्प्लॉईज सोसायटीच्या शेअर्सच्या रकमेबाबतची माहिती सन २००६ पासून मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. एम. डी. चौधरी यांनी केली. ईगल कामगार पतसंस्था मर्यादित. या संस्थेला शासनाचे कोणतेही अनुदान व भरीव अर्थसहाय्य नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, तरीही ईगल कंपनी बंद पडल्यानंतरही श्री. चौधरी यांच्या शेअर्सबाबत आपण पाठपुरावा केला, माहिती दिली. तसेच कंपनीच्या व्यवस्थापनाकडे वेळोवेळी पाठपुरावा करुन श्री. चौधरी यांच्या शेअर्सची रक्कम रु.११,६३८/- त्यांना कंपनीने अदा केली असून धनादेश दि.३०.४.२००८ रोजी श्री. चौधरी यांनी स्वत: स्वीकारला असल्याचे कंपनीने सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, वडगाव मावळ व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २४.९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे / विशेष अपील निर्गत कार्यक्रमातील प्रपत्रामधील नोंदी विचारात घेऊन खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ८५७/ २००९/ पुणे | श्री. सारंग भाऊसाहेब मदाले मोना हौसिंग सोसायटी, एफ-२२, लक्ष्मीनगर, उष:काल कॉलनी रोड, जुनी सांगवी, पुणे-२७ | नगर रचनाकार, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८ | उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८ | सन २००७ -०८ या कालावधीत सांगवी फाटा ते डांगे चौकाचा रस्तारुंदी करण्यासाठी शासनमान्य नकाशाची छायांकित प्रत | अपीलकर्त्याने मू माहिती अर्जान्वये मागणी केलेली सांगवी फाटा ते डांगे चौक थेरगाव रस्ता रुंदीकरणाच शासनमान्य नकाशाची प्रत जन माहिती अधिकारी यांचे दि. ३१.३.२००९ रोजीचे पत्रान्वये अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली आहे. तसेच अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय योग्य आहे अपीलकर्त्याने अपिलात मूळ अर्जापेक्षा अधिक माहिती मागितली आहे, हे योग्य नाही. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | ३०१३/ पुणे | श्री. उल्हास फुलचंद राठोड मु.पो.घारंगी, तांडा नं.१, ता. व जि. उस्मानाबाद | विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय, सोलापूर | विभागीय समाजकल्याण अधिकारी, पी.एम.टी. वर्कशॉप, जानकी हॉल, स्वारगेट, पुणे-३७ | ज्ञानदीप माध्यमिक आश्रमशाळा, तांबेवाडी या शाळेला दि.२२. १०.२००५ रोजी दिलेल्या भेटीच्या अहवालाची सत्यप्रत, कर्मचाऱ्यांचे वेतन, व २००७-०८ या कालावधीतील मान्यताप्राप्त पदे इ. पाच मुद्दयांची माहिती | अपीलकर्त्यास दि.५.८.२००९ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि. १५.७.२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात तिघांच्या एकमताने नमूद केले आहे. |
| ३ | २३७३/ पुणे | श्री.विश्वनाथ नानाराव नाझरे ४८४/१६, लक्ष्मी गदाधर बंगला, मित्रमंडळ कॉलनी, पर्वती पेठ, पुणे-९ | क्षेत्रिय अधिकारी हडपसर, बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे | उप आयुक्त, विभागीय कार्यालय क्र.४, पुणे महानगर-पालिका, पुणे-५ | वानवडी येथील सिटी सर्व्हे नं.७५, हिस्सा क्र.८ व ९ ची कोणाच्या नावाने गुंठेवारी झाली आहे, याची माहिती | अपीलकर्त्यास एक महिन्यांत माहिती देण्याचे दि. १५.७. २००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' तील प्रपत्रात जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी तिघांच्या एकमताने नमूद केले आहे. |
| ४ | १५७६/ पुणे | श्री. बबन आप्पाजी बांगर रा. कुकडी कॉलनी, नारायणगांव, ता. जुन्नर, जि. पुणे | पोलीस निरीक्षक, नारायणगांव पोलीस स्टेशन, ता. जुन्नर, जि. पुणे | अप्पर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक पुणे (ग्रामीण) यांचे कार्यालय, पाषाण, पुणे | सन २००६-०७ या कालावधीत बेल्हे पोलीस स्टेशन येथील पोलीस हवालदार श्री. हुले यांची बदली झाल्यानंतर सहा महिन्यांत ते बेल्हे येथे रूजू झाले, या बदलीची कारणे | दि. ३०.४.२००८ रोजी आवश्यक कागदपत्रे मिळाल्याने कोणतीही तक्रार राहिली नसल्याचे अपीलकर्त्याने अपिलीय प्राधिकारी यांना कळविले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | कोणती तसेच दि. ८.७. २००७ रोजी श्री. संदीप बबन बांगर यांना कुठल्या कलमा खाली अटक करून गुन्हा दाखल करण्यात आला याचा पुराव्यासह तपशील देण्यात यावा. | सदर पत्राची प्रत अपिलीय प्राधिकारी यांनी दि. १५.७. २००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रास जोडलेल्या निवेदनासोबत आयोगास सादर केली आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. वरील तक्त्यातील एकूण ४ अपिले अनुक्रमांक १ ते ४ ( अपील क्र. ८५७/२००९ /पुणे, ३०१३/पुणे, २३७३ /पुणे, व १५७६/पुणे ) निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्र. ३०१३/पुणे व २३७३/पुणे मध्ये निष्कर्षात आदेशित केल्यानुसार कार्यवाही करून अनुपालन अहवाल विहित मुदतपूर्तीनंतर ८ दिवसांत आयोगास सादर करावा, अन्यथा संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये शास्ती व तदनुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १४ .०९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, विधानभवनसमोर, पुणे १

श्री.कृष्णा विश्वनाथ जंगम
मु.पो.ता.वाळवा, जि. सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय सह निबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सांगली , जिल्हा सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८६/ सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | १५.९.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.कृष्णा विश्वनाथ जंगम
मु.पो.ता.वाळवा, जि. सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय सह निबंधक सहकारी संस्था,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर श्री. राजेंद्र महाजन

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सांगली , जि. सांगली प्रतिनिधी श्रीमती जयश्री अमृतसागर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०४.०८.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २.०९.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ०६.०९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७.०९.२००६ |

**८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :**

महाराष्ट्र माहितीचा अधिकार २००२ कायद्यांतर्गत दि. २१/९/२००५ ते ३०/०९/२००५ या कालावधीत किती अपिले दाखल झाली, त्यावर कोणकोणत्या तारखेस सुनावणी झाली, सदर सुनावणी नोटिशींच्या छायाप्रती व सुनावणीनंतर दिलेल्या आदेशांच्या छायाप्रती.

## विवेचन

जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सांगली यांच्याकडे दि. २१.९.२००५ ते ३०.९.२००५ या कालावधीत महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ अंतर्गत दाखल झालेली अपिले, आदेश यांची माहिती अपीलकर्ता श्री. कृष्णा विश्वनाथ जंगम यांनी मागितली होती. ती चुकीची व फसवणूक करणारी दिली, या कारणावरुन श्री. जंगम यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाने आयोजित केलेल्या दि. १४.५.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. माहिती विहित मुदतीत व योग्य दिली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सांगली श्री. ए.एस.कदम व अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर डॉ. ए.बी. जोगदंड यांनी प्रपत्रात नमूद केले. दिलेली माहिती दिशाभूल करणारी व खोटी असल्यामुळे फसवणुकीबद्दल दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी श्री. जंगम यांनी नोंदविली. उभय घटकांमध्ये एकमत न झाल्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

मागणी केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही, म्हणून आपण प्रथम अपील केले. योग्य ते शुल्क घेऊन १५ दिवसांत माहिती देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिला. त्यानुसार जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली. परंतु दाखल झालेली अपिले, सुनावणीसाठी काढलेल्या नोटिसा ही माहिती महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ प्रमाणे दिली. सुनावणीचे आदेश मात्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये दिले. ही चुकीची माहिती व फसवणूक आहे. आपले अपील महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ प्रमाणे असताना आदेशही महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ प्रमाणेच दिला पाहिजे, तो दिला नाही. म्हणजे चुकीची माहिती देऊन फसवणूक केली आहे, असे प्रतिपादन श्री. जंगम यांनी केले.

श्री. जंगम यांनी दि.४.८.२००६ रोजी अर्ज केला. त्यावर दि.२.९.२००६ रोजी माहिती दिली. त्यांच्या अपिलाचा निर्णय दि.२७.९.२००६ रोजी अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिला.

श्री. जंगम यांचे अन्य अपील दि. २६.९.२००५ चे आहे. त्यांच्या सुनावणीची नोटीस दि. ७.१०.२००५ ची असून सुनावणी दि.१४.१०.२००५ रोजी ठेवण्यात आली होती. दरम्यान दि. १२.१०.२००५ पासून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अस्तित्वात आला. त्यामुळे महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ निरसीत झाला. तरीही महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ अन्वये दाखल झालेले श्री. जंगम यांचे

अपील (शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे ) काढून न टाकता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये त्याचा निकाल देण्यात आला. त्या कागदपत्राच्या प्रती श्री. जंगम यांना देण्यात आल्या. यात कोणत्याही फसवणुकीचा प्रश्न येत नाही, तसेच कायदा निरसीत झाल्याचे तांत्रिक कारण दाखवून अपील काढून टाकण्याऐवजी नव्या कायद्यानुसार निर्णय व त्याची माहिती दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री. ए.एस.कदम व अपिलीय प्राधिकारी डॉ. ए.बी. जोगदंड यांचे प्रतिनिधी श्री. राजेंद्र महाजन यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व दाखल करण्यात आलेली कागदपत्रे पाहता श्री. जंगम यांना मूळ अर्जानुसार माहिती देण्यात आली आहे. आपण महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ अन्वये अपील केले. म्हणून कायदा निरसीत झाला असला तरी त्यानुसारच आपल्याला निकाल मिळाला पाहिजे, असा श्री. जंगम यांचा आग्रह आहे. तांत्रिकतेचा आधार घेऊन अपील नाकारण्याऐवजी कार्यवाही केली, ही कृती व म्हणून त्याची माहिती चुकीची असल्याचे श्री. जंगम यांचे प्रतिपादन तांत्रिकतेवर बोट ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांना सोईचे ठरू शकते. परंतु कायद्याचा गाभा लक्षात घेता अधिकाऱ्यांनी तसे न करणेच अधिक योग्य व आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २१.९.२००९**